# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
# खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
# नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

आदेश क्र. जिखप्र/प्रमा-कौशल्य विकास आणि उपजिविका निर्मिती/443/2026

दिनांक-21/01/2026

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

विषय- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "कौशल्य विकास आणि उपजिविका निर्मिती" या शिर्षकाखाली नागपूर जिल्हयात कृषी विस्तार कार्यक्रम सन 2025-26 मध्ये आंतर राज्य शैक्षणिक प्रशिक्षण सहल, जिल्हा अंतर्गत मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण व शेतकऱ्यांना मत्स्यसंवर्धन प्रात्याक्षिक योजना राबविणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

वाचा-
1. भारत सरकार, खाण मंत्रालय, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे सुधारित मार्गदर्शक सुचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/ प्र.क्र. 10/उद्योग-9 मंत्रालय, मुंबई-32, दि. 11 ऑक्टोबर 2024
3. प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर यांचे पत्र जा.क्र./प्र.सं./आत्मा/627/2025 नागपूर दिनांक 20/08/2025
4. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांचे पत्र जा.क्र./स.आ.म/जाआत्मा-ता.मा./4350/ 2025-26 दिनांक 19/08/2025
5. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक / /2024 रोजीच्या मंजुर टिपणीनुसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 पत्रान्वये प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "कौशल्य विकास आणि उपजिविका निर्मिती" या शिर्षकाखाली सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, कार्यालय नागपूर यांच्याद्वारे प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर यांचे मार्फत नागपूर जिल्हयातील कृषी विस्तार कार्यक्रम सन 2025-26 मध्ये आंतर राज्य शैक्षणिक प्रशिक्षण सहल, जिल्हा अंतर्गत मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण व शेतकऱ्यांना मत्स्यसंवर्धन प्रात्याक्षिक योजना इत्यादी राबविणेबाबत अंदाजित किंमत **रु. 7,17,500/- (अक्षरी रु. सात लक्ष सतरा हजार पाचशे फक्त)** इतक्या रकमेकचा प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेला आहे. संदर्भ क्र. 4 पत्रान्वये सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांनी सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भ क्र. 6 च्या टिपणीनुसार मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान केलेली आहे.

**नियोजित कामांचे विवरण:-**

| अ.क्र. | जिल्हा | कार्यान्वित यंत्रणा | कामाचे विवरण | प्रशासकीय मान्यता किंमत | या आदेशान्वये वितरीत करावयाचे 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर | प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर | आंतर राज्य शैक्षणिक सहल | 437500 | 87500 | **प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (उच्च प्राथम्य बाबी)** |
| 2 | | | जिल्हांतर्गत मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण | 40000 | 8000 | |
| 3 | | | शेतकऱ्यांत मत्स्यसंवर्धन प्रात्याक्षिक योजना | 240000 | 48000 | |
| | | | **एकुण** | 717500 | 143500 | |
| | | | | | | **(अक्षरी- रू. एक लक्ष त्रेचाळिस हजार पाचशे फक्त)** |

